महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक — ११ जुलै, २०२४

## - : प्रसिद्धीपत्रक : -

**विषय :-** दिनाक ८ जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी अतिवृष्टीमुळे अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांकरिता मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्याबाबत ( जाहिरात क्रमांक १११/२०२३)

दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी आयोगामार्फत - मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीचे आयोजन करण्यात आले होते, परंतु त्या दिवशी मुंबई परिसरात अतिवृष्टी झाल्याने वाहतुकीच्या साधनावर परिणाम झाला होता. परिणामी सदर दिवशी चाचणीसाठी उमेदवारांना उपस्थित राहता यावे याकरिता चारही सत्रांची कौशल्य चाचणी ही नियोजीत वेळेपेक्षा ४५ मिनिटे उशिराने सुरु करण्याचा निर्णय आयोगाने घेतला होता. तरीही अतिवृष्टीमुळे अनेक उमेदवारांना चाचणीसाठी उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी अनुपस्थित असलेल्या उमेदवारांना संधी देण्याच्या दृष्टीने टंकलेखन कौशल्य चाचणी पुन्हा घेण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. सदरहू मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी दिनांक १३ जूलै, २०२४ रोजी ३ -या व ४ थ्या सत्रात आयोजित करण्यात येईल. टंकलेखन कौशल्य चाचणीच्या ठिकाणाचा तपशील व उमेदवारांना विहित करण्यात आलेली वेळ इत्यादी तपशील प्रवेशप्रमाणपत्राद्वारे अवगत करण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण:- नवी मुंबई

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग